# दि जळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,जळगांव

मुख्य कार्यालयः- २७ रिंगरोड जळगांव ४२५ ००२

दूरध्वनी- पी.बी.एक्सः- (०२५७) २२४१६७१ ते २२४१६७३,७६,७८,७९

नोंदणी क्र. ११२९ दि. २७.५.१९१६, बँकिंग परवाना नं. आरपीसीडी (एमआरओ) २२७०/१८.०१.०३८/२०११-१२ दि. २८.३.२०१२

फॅक्सः- (०२५७) २२२१७१२ Mail-Id : jdccbank_jal@sancharnet.in


## -०-विस्तृत जाहिरात-०-

दि जळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि, जळगांव यांच्या आस्थापनेवरील व अधिपत्याखाली असलेली कारकून पदे भरण्याकरीता निवड सुची तयार करणेसाठी खालील प्रवर्गातील सरळसेवा भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून विहीत नमुन्यात महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्या. पुणे (एम. के. सी. एल.) या शासनमान्य संस्थेमार्फत अर्ज ऑनलाईन पध्दतीने http:oasis.mkcl.org/jdccb2013 या संकेत स्थळावर मागविण्यात येत आहेत.

**अर्ज ऑनलाईन नोंदणी करण्याचा कालावधी दि.१९ /७ /२०१३ ते ५ /८ /२०१३**

**१) पदाचे नांवः-कारकून ( बँकिंग असिस्टंट )**
**प्रवर्गानुसार भरावयाच्या जागाः-**

| अ नं | संवर्ग | प्रवर्ग | भरावयाच्या जागा | महिला ३०% | माजी सैनिक १५% | प्रकल्प ग्रस्त ५% | खेळाडू ५% | अपंग ३% | अंशकालीन पदवीधर बेरोजगार १०% | प्रवर्गातील इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कारकून | अनुसुचीत जाती | ३३ | १० | ५ | २ | २ | १ | ३ | १० |
| | | अनुसुचीत जमाती | १८ | ५ | ३ | १ | १ | १ | २ | ५ |
| | | वि.जा.अ | ९ | ३ | १ | -- | -- | -- | १ | ४ |
| | | भज ब | ७ | २ | १ | -- | -- | -- | १ | ३ |
| | | भज क | ९ | ३ | १ | -- | -- | -- | १ | ४ |
| | | भज ड | ६ | २ | १ | -- | -- | -- | १ | २ |
| | | वि.मा.प्र. | ५ | १ | १ | -- | -- | -- | -- | ३ |
| | | ई.मा.व | २२ | ७ | ३ | १ | १ | १ | २ | ७ |
| | | खुले | ५१ | १५ | ८ | ३ | ३ | २ | ५ | १५ |
| | एकुणः- | | १६० | ४८ | २४ | ७ | ७ | ५ | १६ | ५३ |

**टिपः-** वर नमुद पदसंख्येमध्ये बदल होवू शकतो त्यामुळे जातीच्या प्रवर्गानिहाय आरक्षीत पदांची संख्या सुध्दा कमी / जास्त होवू शकते. समांतर आरक्षण शासकीय नियमानुसार राहील. समांतर आरक्षणाचे उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या जागी ज्या त्या प्रवर्गातील उमेदवाराची निवड केली जाईल.

**२) शैक्षणिक अर्हताः-**

मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवी किमान ५० टक्के गुणासह आणि वाणिज्य पदविधर असल्यास ४५% गुणासह उत्तीर्ण केलेली असावी. तसेच किमान एमएससीआईटी परिक्षा किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण आवश्यक. संगणकाचे पदविधर असल्यास प्राधान्य दिले जाईल.

३) **वयोमर्यादाः- (दि. १९ ।७ ।२०१३ रोजी )**

१) दि.१९ ।७ ।२०१३ रोजी सर्व प्रवर्गासाठी किमान वयोमर्यादा १८ वर्षे पुर्ण राहील. खुला प्रवर्गासाठी कमाल वयोमर्यादा ३३ वर्षे राहील.

२) मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांसाठी ( महिलांसह ) कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे राहील.

३) माजी सैनिक, अपंग, भुकंपग्रस्त/ प्रकल्पग्रस्त उमेदवारांकरिता वयोमर्यादा ४५ वर्षे, राहील.

४) अत्युच्य गुणवत्ताधारक खेळाडुंचे उमेदवाराकरीता कमाल वयोमर्यादा मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४३ वर्षे राहील व खुला प्रवर्गासाठी ३८ वर्षे राहील.

५) मागासवर्गीय अंशकालीन पदविधर उमेदवाराच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ४६ वर्षे राहील.

६) शाळा सोडल्याच्या प्रमाणपत्रानुसार/ एस.एस.सी. प्रमाणपत्रानुसार जन्मतारीख गृहीत धरण्यात येईल.

४) **वेतनमानः-**

प्रचलित वेतनश्रेणी रूपये ४५०-२०-५१०-२५-५८५-३०-७३५-इ.बी-३५-९१०-४५-११३५-एचडीसी/ जी. डी. सी. ॲण्ड ए.-५५-१४१० नुसार परिविक्षाधीन कालावधी नंतर पगार देय राहील.

५) **निवड कार्यपध्दतीः-**

**अ) ऑनलाईन परिक्षा :-**

कारकून पदांकरिता १५० गुणांची ऑनलाईन परिक्षा घेण्यात येईल. सदर परिक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरूपाच्या असतील यामध्ये बँकिंग, इंग्रजी, समान्यज्ञान, संगणक, गणित व बौध्दीक चाचणी या विषयावरील प्रश्नांचा समावेश असेल.

**ब) मुलाखतः-**

लेखी परिक्षेत यशस्वी होणाऱ्या उमेदवारांना बँक धोरणानुसार भरावयाचे पद संख्येच्या प्रमाणात लेखी परिक्षेचे गुणानुक्रमे ५० गुणांसाठी मुलाखतीस बोलविण्यात येईल.

**क) उमेदवारांची अंतीम निवड सुचीः-**

निवड समिती प्रतिनिर्धीनी मोजदाद केलेल्या मुलाखत गुणांची सरासरी अधिक लेखी परिक्षेतील गुण यांचे गुणानुक्रमे अंतीम निवड सुची तयार करण्यात येईल.

**ड) परिविक्षाधिन कालावधीः- (Probation Period)**

निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना प्रथम एक वर्षासाठी परिविक्षाधिन (प्रोबेशन) सेवेत नेमणुक दिली जाईल. नेमणुक दिलेल्या उमेदवारास परिविक्षाधिन कालावधीमध्ये दरमहा संकलीत पगार रूपये ४०००/- ( अक्षरी रूपये चार हजार मात्र ) मासिक वेतन देण्यात येईल. या कालावधीतील उमेदवारांचे कामकाज वर्तणुक विचारात घेवून वेतन श्रेणी लागु केली जाईल.

**इ)** उमेदवार मुलाखतीस गैरहजर राहिल्यास तो निवडीस पात्र राहणार नाही.

**फ)** निवड झालेल्या उमेदवारास जळगांव जिल्ह्यातील बँकेच्या कोणत्याही शाखेत नेमणुक दिली जाईल व त्या शाखेवर काम करणे बंधनकारक राहील.

६) आवेदन शुल्कः-

| पद | मागासवर्गीय प्रवर्ग | खुला प्रवर्ग |
|---|---|---|
| कारकून | रूपये ५००/- | रू. ६००/- |

सदर आवेदन शुल्क हे नापरतावा राहील. आवेदन शुल्क जाहिरातील नमुद केलेल्या पध्दतीनुसार स्टेट बँक ऑफ इंडियाच्या कोणत्याही शाखेत भरावयाचे आहे. बँकेने दिलेल्या जमा रक्कमेचा डीपॉझीट जर्नल नंबर (Deposit Journal No ) इ. तपशिल स्वतःजवळ जतन करावयाचा आहे. बँकेत परिक्षा शुल्क भरण्यासाठी आवश्यक चलन MKCL चे http://oasis.mkcl.org/jdccb2013 या संकेतस्थळावर उपलब्ध केला आहे. स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेतुन हा भरणा करता येईल.

७) आरक्षणः-

१) आर्थीक वर्ष २०१२-१३ चे नॉन क्रिमीलेअर ( उन्नत व प्रगट गटात मोडत नसल्याबाबत ) प्रमाणपत्र विमुक्त जाती / भटक्या जमाती प्रवर्गातील उमेदवारांसीठी आवश्यक राहील.

२) उमेदवार ज्या राखीव जाती प्रवर्गाच्या पदासाठी अर्ज करीत असेल त्या जाती प्रवर्गाचे सक्षम अधिकाऱ्यांनी निर्गमीत केलेले जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. उमेदवाराची अंतीमतः निवड झाल्यानंतर शासकिय निर्णय (जीआर) बीसीसी २०११/प्र.क्र. १०६४/२०११/१६-ब दि. १२ डिसेंबर २०११ नुसार उमदेवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांका पासुन ६ महिन्यांचे आंत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील. जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविल्यास अशा उमेदवारांची नियुक्ती रद्द करुन जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांचे पडताळणीचे विनियमन / अधिनियम २००० यातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

३) माजी सैनिक असल्यास त्या बाबतचे सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र आवश्यक ( फक्त माजी सैनिक राखीव पदासाठी )

४) महिलांच्या आरक्षणाचा (विमुक्त जाती / भटक्या जमाती ) लाभ घेणाऱ्या इच्छुक महिला उमेदवारांनी महाराष्ट्र शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्यांकडून ते नॉन क्रिमीलेयर प्रवर्गात असल्याचे दर्शविणारे चालु वर्षाचे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करावे.

५) महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याबाबत सक्षम अधिकार्याचे अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

६) वर नमुद केलेले सर्व प्रमाणपत्रे ज्या उमेदवारांना लागु आहेत. त्यांनी ती मुळ प्रतीसह ( ओरीजनल ) पडताळणीसाठी दाखल करणे आवश्यक आहे.

७) पुढील अपंग असलेले उमेदवार प्रस्तुत पदासाठी पात्र आहेत अ) लो-व्हीजन (L.V.) ब) अल्प बहिरे पणा (P.D.) क) अस्थिव्यंग असलेले ( एका पायाने अधु, एका हाताने अधु ) (OL,OA) अपंगासाठी आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या उमेदवाराने त्याचे अपंगत्वाचे प्रमाण किमान ४०% असले बाबतचे विहीत नमुन्यातील जिल्हा शल्य चिकित्सक यांचे प्रमाणपत्र कागदपत्रे पडताळणी वेळी दाखल करणे आवश्यक आहे.

८) या जाहीरातीमधील श्रेणी प्रवर्ग व समांतर आरक्षणानुसारचे पदसंख्येत बदल करणेचा अधिकार बँकेने राखुन ठेवलेला आहे. त्या बाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही.

८)अर्ज करण्याची पध्दतीः-

१) अर्ज करण्याची पध्दती ही पुर्णतः ऑनलाईन राहणार आहे. पात्र उमेदवाराने अर्ज http://oasis.mkcl.org/jdccb2013 ह्या संकेत स्थळावर भरावयाचा आहे.

२) उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतेवेळी सर्व आवश्यक कागदपत्रे आणि स्वतःचा अलीकडील काळातील पासपोर्ट साईज फोटो व सहीची scanned image स्वतःजवळ असण्याची खात्री करावी. फॉर्म भरते वेळी आपल्याला फोटो व सहीची image upload करावी लागेल.

३) ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी Apply Online ह्या लिंक वर क्लीक करून अर्ज भरण्यास सुरूवात करावी.

४) आपल्यास विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर ( Yes/No) पैकी योग्य पर्याय निवडा, संगणक प्रणालीत तुंम्ही दिलेल्या उत्तरांच्या आधारे तुमची प्राथमिकपात्रता तपासेल.

५) आवश्यक माहिती भरल्यानंतर संगणक प्रणाली तुमचा लॉगीन आय.डी. पासवर्ड आणि एस.बी.आय चलन निर्माण करून तुंम्हाला तुमच्या स्क्रीनवर लॉगीन आय.डी.पासवर्ड दाखवेल आणि तुंम्ही पुरविलेल्या मोबाईल क्रमांकावर SMS करेल ( कृपया आपण आपला मोबाईल क्रमांक अचुक टाकावा जेणे करून आपल्याला लॉगीन आय.डी.आणि पासवर्ड ची माहिती आपल्या मोबाईल क्रमांकावर एस.एम.एस.द्वारे प्राप्त होईल ) हा लॉगीन आय.डी.म्हणजेच तुमचा अर्ज क्रमांक असेल.

६) तुमचा लॉगीन आय.डी. आणि पासवर्डची माहिती व चलन "Print My Login Challan details" ह्या बटनवर क्लीक करून प्रिंट करावी.

७) चलन प्राप्त केल्या नंतर, कार्यालयीन कामकाजाच्या दुसऱ्या दिवशी आपल्या नजीकच्या भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये जावे व चलनावर दर्शविलेले शुल्क बँकेत जमा करावे. बँक तुंम्हाला शुल्क जमा केल्याची पोहोच देईल.

८) कृपया शुल्क, चलनावर दर्शवलेल्या अंतिम तारखेच्या आत भरा. एकदा भरलेले शुल्क कोणत्याही कारणास्तव परत केली जाणार नाही.

९) भारतीय स्टेट बँकेत चलनाद्वारे शुल्क भरल्यानंतर कार्यालयीन कामकाजाच्या दुसऱ्या दिवशी उर्वरित ऑनलाईन अर्ज **Fill Application Form / अर्ज भरा** ह्या लिंकवर क्लीक करून अर्ज पुर्ण भरावा. भारतीय स्टेट बँकेत चलनाद्वारे शुल्क भरल्यानंतर अर्जदाराने अर्जामध्ये खालील माहिती भरून अर्ज पुर्ण करणे आवश्यक आहे त्याशिवाय आपला अर्ज पुर्ण होणार नाही.

**वैयक्तीक माहिती ,आरक्षण बद्दलची माहिती, शैक्षणिक माहिती, फोटो आणि सही अपलोड, कामाचा अनुभव, इतर आवश्यक माहिती**

वरील सर्व माहिती अर्जामध्ये भरावी ती भरल्याशिवाय आपला अर्ज पुर्ण होणार नाही. माहिती भरल्यानंतर अर्जाची प्रिंट काढून आपल्या माहितीसाठी जतन करून ठेवावी. ऑनलाईन अर्ज पुर्ण भरल्यानंतर अर्जाची प्रत बँकेला किंवा एम.के.सी.एल. ला पाठविण्याची आवश्यकता नाही. तुमची अर्ज प्रक्रिया येथे पुर्ण होते. अर्जदाराने नियमितपणे वेबसाईट चेक करावी. ऑनलाईन परिक्षेचे ओळख पत्र परिक्षापुर्वी तुमच्या लॉगीनमध्ये व वेबसाईट वर उपलब्ध राहिल. ह्यासाठी वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

**९) महत्वाच्या तारखाः-**

अर्ज करण्यासाठीचे वेळापत्रकः-

| अनु. क्रमांक | कार्यक्रम | दिनांक | |
|---|---|---|---|
| | | पासुन | पर्यंत |
| १. | अर्ज ऑनलाईन नोंदणी करण्याचा कालावधी | दि.१९.७.२०१३ | दि.५.८.२०१३ |
| २. | संगणकीय चलनाद्वारे स्टेट बँक ऑफ इंडिया (SBI) यांच्या शाखांमध्ये फी स्वीकृतीचा कालावधी | दि २०.७.२०१३ | दि.७.८.२०१३ |

| | | |
|---|---|---|
| ३. | ज्या उमेदवारांनी बँकेमध्ये दिनांक ७.८.२०१३ पर्यंत भरती प्रक्रिया शुल्क जमा केले असेल त्यासाठी उरलेला ऑनलाईन अर्ज भरण्याचा कालावधी | दि.९.८.२०१३ |

**१०) सर्व साधारण अटी / सुचनाः-**

१) अर्ज भरण्यापुर्वी उमेदवाराने जाहीरातीत नमुद केलेल्या सर्व आवश्यक अर्हता आपण पुर्ण करीत आहोत कां याची खात्री करून घ्यावी. बँक उमेदवार मुलाखतीकरीता पात्र असल्यानंतर मुळ दस्तऐवजा संदर्भातील अर्हतेच्या अटीची पडताळणी करेल. या जाहीरातीत नमुद करण्यात आलेल्या विहीत आवश्यक अर्हतेच्या पुर्तीच्या अधीन राहून उमेदवारांचा भरती प्रक्रियेमधील प्रवेश पुर्णतहः तात्पुरता असेल.

२) ज्या उमेदवारांनी ऑन लाईन नोंदणी केलेली आहे आणि आवश्यक आवेदन शुल्क आदा केलेले आहे, त्यांना परिक्षेकरिता online Call Latters Download करण्याची मुभा आहे. online Call Latters पाठवितांना अर्जाची तपशिलवार छाननी करण्यात येणार नाही. Call Latters http://oasis.mkcl.org/jdccb2013 या संकेत स्थळावर Download करता येईल.

३) जाहीरात देण्यात आलेल्या पदाकरीता चाचणी, व्यक्तीगत मुलाखत आणि निवड झालेल्या उमेदवारांची यादी वेळोवेळी बँकेच्या http://oasis.mkcl.org/jdccb2013 या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

४) भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर उमेदवाराने सादर केलेली माहिती खोटी / चुकीची आढळून आली तर त्याच्या / तिच्या उमेदवारीचा विचार केला जाणार नाही.

५) निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवारांनी अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती / कागदपत्रे / प्रमाणपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी व नियुक्ती निवड प्रक्रियेच्या / सेवेच्या कोणत्याही टप्यावर रद्द करण्यात येईल.

६) परिक्षेस बसण्यास दिलेली परवानगी म्हणजे विविक्षित पात्रता नसुन उमेदवाराची गुणवत्तेनुसार निवड झाल्यास अंतीम निवडीपुर्वी त्यांची मुळ प्रमाणपत्रे छाननीच्या अधिन राहून परिक्षेला बसण्याची परवानगी देण्यात येत आहे.

७) भरती संबंधातील बँकेचे सर्व निर्णय अंतीम असतील आणि कोणत्याही व्यक्तीगत पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही. बँकेच्या कार्यक्षेत्रातील उमेदवारांना प्राधान्य राहील.

८) उमेदवार अर्ज करण्यास पात्र असल्याबाबत आणि ऑनलाईन अर्ज अचुक भरण्याबाबतची वैयक्तीक जबाबदारी उमेदवाराची राहील. तसेच ऑन लाईन अर्ज भरतांना कोणत्याही स्थरावर चुकीची माहिती भरल्यामुळे अर्ज अपात्र ठरल्यास त्याबाबतची संपुर्ण जबाबदारी उमेदवाराची राहील.

९) ऑनलाईन परिक्षेनंतर ज्या उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलवावयाचे आहे. अशा उमेदवारांना मुलाखतीपुर्वी कागदपत्रे पडताळणीसाठी बोलविले जाईल.

१०) सहाय्यक संचालक जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र जळगांव, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यावल ता.यावल जिल्हा जळगांव, जिल्हा सैनिक बोर्ड जळगांव, जिल्हा पुर्नवसन अधिकारी जळगांव व जिल्हा क्रिडा अधिकारी जळगांव या कार्यालयाकडून शिफारस होणाऱ्या उमेदवारांनी जाहिरातीत विहीत केलेले परिक्षा शुल्क भरून अर्ज करणे आवश्यक राहील. सदर अर्ज न करणाऱ्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही.

११) काही अपरिहार्य / आपत्कालीन कारणास्तव परिक्षा स्थगित करणे / पुढे ढकलणे, अंशतः बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार बँक राखुन ठेवत आहेत. भरती प्रक्रियेसंदर्भात उदभवणारे वाद, तक्रारीबाबत बँकेचा निर्णय अंतीम राहील. निवड प्रक्रीये संदर्भात कोणताही वाद निर्माण झाल्यास तो जळगांव येथील न्याय कक्षेत येईल.

१२) शासकिय कार्यालयामध्ये अंशकालीन काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रात अनुभवाची नोंद असलेल्या उमेदवारांनी आवश्यक ते पुरावे व दाखले कागदपत्रे पडताळणी वेळी सादर करणे अनिवार्य आहे.

१३) महाराष्ट्र नागरी सेवा ( लहान कुटूंब प्रतिज्ञापत्र ) नियम २०५ अन्वये विवाहीत उमेदवाराने त्यांच्या अर्जाच्या दिनांकास हयात असलेल्या संख्ये बाबत विहीत नमुन्यात प्रतिज्ञापत्र करणे बंधनकारक राहील.

**ठिकाणः- जळगांव**
**दिनांकः- १८।७।२०१३**

**कार्यकारी संचालक चेअरमन**
**दि जळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि,जळगांव**

रोटे-adme-adme-Jaherat-४